# ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल. पदवी परीक्षेसाठी 'श्री. म. माटे यांची कथा-एक अभ्यास' हा लघु प्रबंध तयार करीत असताना माझ्या अभ्यासाला दिशा देणाऱ्या सर्वांची मी ऋणी आहे.

प्रबंधिकेच्या विषय निवडीपासून प्रबंधिका पूर्ण होईपर्यंत माझे मार्गदर्शक गुरूवर्य डॉ. शिवशंकर उपासे सर यांचे स्नेहाचे व अनमोल असे मार्गदर्शन लाभले. प्रबंधिकेच्या निमित्ताने सरांशी वारंवार चर्चा केल्याने माझ्या प्रबंधिकेचे काम मी वेळेत पूर्ण करू शकले. त्यामुळे सरांचे आभार मानणे शब्दांच्याही पलीकडे आहे. त्यांच्या ऋणात राहण्यात मला अतिशय आनंद वाटतो.

एम. फिल. अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी अनुमती देणारे आमच्या संस्थेचे सचिव श्री. जी. के. वाय. केरकर, कॉलेजचे प्राचार्य बी. बी. चौगुले तसेच देवचंद कॉलेज, अर्जुननगरचे प्राचार्य डॉ. एम. जे. कशाळीकर सर यांचे आभार. तसेच डॉ. पी. व्ही. कुलकर्णी, प्रा. सौ. संध्या देशपांडे, प्रा. सौ. दीपा कुलकर्णी या गुरूवर्यांबरोबर केलेली चर्चा मला मोलाची वाटते. त्यामुळे त्यांचे ऋण व्यक्त करणे महत्वाचे ठरते.

देवचंद कॉलेज, अर्जुननगरचे ग्रंथपाल श्री. शुक्ल, ग्रंथालयाचा कर्मचारी वर्ग, आजरा महाविद्यालय, आजराचे ग्रंथपाल श्री. कुंभार व कर्मचारी वर्ग, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी ग्रंथालय, सार्वजनिक वाचनालय, बेळगाव, माझे सहकारी प्रा. डॉ. अनिल गवळी, प्रा. सुनील गुरव यांचे मन:पूर्वक आभार.

माझ्या पंखांना बळ देणारे जन्मदाते माता पिता व भगिनी सौ. मानसी खरे व चि. गीता यांनी मला सातत्याने प्रेरणा दिली व सहकार्याचा वर्षाव केल्याने माझी वाटचाल सुकर झाली.

ति. सौ. आई नानांनी आस्थेवाईकपणे केलेली विचारणा व स्नेहाचा वर्षाव मला प्रेरणादायी ठरला. माझे यजमान श्री. रामचंद्र गाडगीळ व गाडगीळ कुटुंबियांनी दिलेले मानसिक स्वास्थ्य व प्रबंधिका पूर्णत्वाकडे घेऊन जाण्यासाठी करून दिलेली अनुकूल परिस्थिती यामुळे प्रबंधिका पूर्ण होऊ शकली याची मला जाणीव आहे.

संगणकाद्वारे ही प्रबंधिका सौ. रागिणी विभुते यांनी पूर्ण केली त्याबद्दल त्यांचे आभार. खरे तर या कामी मला ज्यांनी प्रेरणा, प्रोत्साहन, सूचना, सहकार्य केले त्या सर्वांचा नामोल्लेख करणे अशक्य आहे. त्या सर्वांबद्दल माझ्या मनात कृतज्ञता असून त्या सर्वांचे शतश: आभार,

अभ्यासक

वंदना गोविंद केळकर